# GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING

(An autonomous Institute of Government of Maharashtra)

*" In Pursuit of Goble Competitiveness"*

**Staion Road , Osmanpura Aurangabad – 431 005 (MS), India**

☎ - (0240)2366101,2366202,2366111,**Fax:**(0240)2332835

ncipalgeca@yahoo.com, office.geoeaurangabad@dtemaharashtra.gov.in

web : http://www.geca.ac.in


# 9th Meeting

# of

# Finance Committee

**Date : 06th Sept. 2018**

**Venue : T & P Cell**

Minutes of Meeting

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

**इतिवृत्तान्त**

जा.क्र.शाअमऔ/अर्थसबै/लेखा/स्टेनो/२०१८/२९७६
**दिनांक :- ७/९/२०१८**

दिनांक ०६/०९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता डॉ. पी.बी. मुरनाळ, प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण व आस्थापना कक्षात अर्थ समितीची (Finance Committee) बैठक आयोजित करण्यात आली होती व खालील अधिकारी बैठकीस उपस्थित होते. खालील मुद्यांची चर्चा होऊन खालील विभागप्रमुखांना खरेदी बाबत कांही सूचना देण्यात आल्या. सदरील बैठकीचा इतिवृत्तान्त.

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| ०१ | मा. श्री विवेक भोसले, अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ |
| ०२ | मा. श्री आर.डी. वैद्य, सदस्य, व्यवस्थापन मंडळ |
| ०३ | डॉ. पी.बी. मुरनाळ, अध्यक्ष, अर्थ समिती |
| ०४ | सी.ए. राजकुमार आय. कोठारी, सदस्य अर्थ समिती |
| ०५ | डॉ. यु.जे. कहाळेकर, प्राध्यापक स्थापत्य अभि. सदस्य |
| ०६ | श्री डी.एच. चव्हाण, माहिती समन्वयक अधिकारी |

प्रथम प्राचार्यांनी सर्व मान्यवरांचे व अर्थ समिती सदस्यांचे स्वागत केले व नंतर बैठकीस सुरुवात करण्यात आली व आजच्या अर्थ समितीच्या बैठकीचा आशय काय आहे हे त्यांनी विशद केले.

**बाब क्र. १)** मागील अर्थ समितीच्या जा.क्र.शाअमऔ/लेखा/२०१८/१२७५ दिनांक २३/४/२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्तान्त वाचून कायम करण्यात आले.

**बाब क्र. २)** परिक्षा विभाग व कार्यालयाचा सन २०१७-२०१८ चा सनदी लेखापालांनी केलेल्या लेखा परिक्षणाला मान्यता देण्यात आली. तसेच लेखापरिक्षणात दर्शविलेल्या एजन्सीकडून, टीडीएस कपात करण्यात आलेली नाही. सदरील कपात वसुल करुन आयकर विभागाच्या खात्यावर जमा करण्याच्या सूचना दिल्या.

**बाब क्र. ३)** आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी विविध विभागांना वाटप केलेल्या ( आवर्ती व अनावर्ती ) कार्यवाही बाबत चर्चा करण्यात आली. सर्व विभागाचे अनुदान मंजूर करण्यात आले व खालील विभागप्रमुखांना खरेदी बाबत कांही सूचना देण्यात आल्या. विभागप्रमुख, यंत्र अभि. यांनी त्यांच्या विभागात खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्रि बाबत अर्थ समितीला माहिती दिली. त्यांच्या माहितीनंतर त्यांना अर्थ समितीने खरेदीबाबत उशीर झालेला आहे. विभागात लागणा-या यंत्रसामुग्रिच्या खरेदीबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे सूचविले व डिसेंबर २०१८ पर्यंत खरेदी करण्याचे सांगितले. विभागप्रमुख विद्युत अभियांत्रिकी यांनी त्यांच्या विभागात लागणा-या यंत्र सामुग्रिबाबत अर्थ समितीला माहिती दिली. तसेच कर्मशाळा अधिक्षक यांनी त्यांच्या विभागास लागणा-या यंत्रसामुग्रिची माहिती दिली व लेदर कटींग मशीन खरेदी बाबत वेगळे प्रपोजल सादर करण्याच्या सूचना दिल्या. कांही यंत्रसामुग्रि ही एकत्रित विभासाठी ठेवता येत असल्यास त्या प्रमाणे कर्मशाळा अधिक्षकांना सूचना केल्या.

(कृ. मागे पाहा)

म्हणून Robotic arm ची रक्कम रु. १२.५० लक्ष वगळण्यात आले व कर्मशाळा विभागाच्या सुधारीत यादीस मान्यता देण्यात आली व सन २०१८-१९ साठी पुर्वी मंजूर अनावर्ती रक्कम २९.१०+१२.४३=४१.५३ एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागाच्या खरेदीची प्रक्रिया डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे समितीने सूचना दिल्या आहेत.

**बाब क्र. ४)** सन २०१८/१९ करिता संस्थेतील विविध विभागांना(आवर्ती व अनावर्ती) खर्चासाठी वितरीत केलेले अनुदान व दिनांक ३१/८/२०१८ पर्यंत झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या आढाव्याचे अवलोकन करण्यात आले.

**बाब क्र.५)** पुरवणी अनुदान मंजूरीबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले व पुरवणी अनुदानास (रु.२०५.११ लक्ष) मंजूरी देण्यात आली.

**बाब क्र.६)** व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील सूचने प्रमाणे शैक्षणिक व अशैक्षणिक बाबीच्या अनुदानाची पुर्नरचना करुन सुधारीत विवरणपत्र सादर केलेल्या अनुदानाला मान्यता देण्यात आली.

**बाब क्र. ७)** टेक्यूप – तीन करिता एनपीआयुच्या निर्देशानुसार संस्थास्तरावर सनदी लेखापालाची (C.A.) नियुक्ती करण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा झाली. सदर समितीने २/३ नवीन एजन्सीकडून प्रोफाईल मागवून घेऊन Internal Auditor व Statutary Auditor नेमावे असे समितीने सूचविले. एजन्सीकडील तात्पुरत्या स्वरुपात नेमेलेल्या उमेदवाराच्या सेवेत खंड देण्यात यावे असे समितीकडून सूचविण्यात आले.

शेवटी सर्वांचे आभार व्यक्त करुन बैठक संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

**( डॉ. पी.बी. मुरनाळ )**
प्राचार्य, तथा अध्यक्ष अर्थ समिती
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद.

प्रत :- वरील सर्व अधिकारी यांना माहितीस्तव.